# प्रेसनोट
# चंद्रपूर जिल्हा कारागृह वर्ग -1
# कारागृहातील महिला बंदयांकरीता ब्युटी पार्लर प्रशिक्षण कार्यक्रमाचे उदघाटन
# दिनांक १७.०३.२०२५

कारागृह  सेवा ही अत्यंत संवेदनशिल सेवा असुन कारागृहामध्ये वेगवेगळया गुन्हयातील आरोपी बंदीस्त असतात. कारागृहामध्ये येणाऱ्या बंदयांच्या गुन्हेगारी प्रवृत्ती मध्ये बदल घडवून बंदयांत सुधारणा व पुर्नवसनाच्या दृष्टीने कार्य करण्यात येते. तसेच सुधारणा व पुनर्वसन हे महाराष्ट्र कारागृहाचे ब्रीद वाक्य असून कारागृहातील बंदयाकरीता विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येतात.  कारागृह अधीक्षक मा.श्री अनुपकुमार कुमरे साहेब यांचे प्रयत्नातून इनरव्हिल क्लब ऑफ चंद्रपूर व चंद्रपूर जिल्हा कारागृह  यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रपूर जिल्हा कारागृहमध्ये आज दिनांक 17/03/2025 रोजी श्रीमती सुचिता जेउरकर,अध्यक्ष इनरव्हिल क्लब ऑफ चंद्रपूर यांचे हस्ते फीत कापून महिला बंदी करीता 15 दिवशीय " ब्युटी पार्लर " प्रशिक्षण कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आलेले आहे. श्रीमती अवनी कासमगोटूवार प्रशिक्षक व श्रीमती वैशाली पंडीले प्रशिक्षक.चंद्रपूर  यांनी कारागृहातून महिला बंदी बाहेर पडल्यानंतर त्यास उपजिविकेचे साधन उपलब्ध होण्याचे दृष्टीने इनरव्हिल क्लब ऑफ चंद्रपूर अंतर्गत सुरु असलेल्या  ब्युटी पार्लर व्यावसायीक  प्रशिक्षणा बद्दल मार्गदर्शन केले  सदर कार्यक्रम,श्रीमती सुचिता जेउरकर,श्रीमती कविता झाडे,श्रीमती वैशाली अडकिने,श्रीमती स्वेता मस्के,श्रीमती अल्का चांदेकर,श्रीमती विद्या ताकसांडे,श्रीमती अश्विनी तुराणकर,श्रीमती रजनी गुरनुले,श्रीमती शितल भगत यांच्या उपस्थित कार्यक्रम पार पडला.सदर प्रशिक्षणाचा  39 महिला बंदीनी लाभ घेतलेला आहे.

---स्वाक्षरी---
अधीक्षक
चंद्रपूर जिल्हा कारागृह वर्ग-01